नवराष्ट्र
Ratnagiri-Sindhudurg | 31 October 2026 | Page 1

रस्त्यावरील खड्डे भरण्याच्या कामाला भरणे-कुडाशी मार्गावर ठिकठिकाणी आहे. दुकानामध्ये गर्दी करत आहेत.

महत्त्वपूर्ण पाऊल

फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेडच्या सीएसआर उपक्रमांतर्गत : दोन अंगणवाड्यांचे लोकार्पण

मुकुल माधव फाऊंडेशनतर्फे अंगणवाडी नूतनीकरण

गोळप व कोळंबे यांचा समावेश

▶ रत्नागिरी, प्रतिनिधी. ग्रामीण भागातील बालकांना सुरक्षित, स्वच्छ, आनंददायी आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी पोषक वातावरण मिळावे, या उद्देशाने फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेडच्या सीएसआर उपक्रमांतर्गत मुकुल माधव फाऊंडेशनतर्फे रत्नागिरी जिल्ह्यात अंगणवाडी नूतनीकरणाचा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत आतापर्यंत एकूण १९ अंगणवाड्यांचे नूतनीकरण पूर्ण करण्यात आले असून, त्यापैकी आज रत्नागिरी तालुक्यातील गोळप–दाभिळवाडी आणि कोळंबे–बागवाडी येथील दोन नूतनीकरण केलेल्या अंगणवाड्यांचे लोकार्पण करण्यात आले.



रितू छाब्रिया आणि प्रकाश छाब्रिया यांच्या दरदृष्टीतून

फिनोलेक्स वयनीच्या ४५ वर्षांच्या गौरवशाली वाटचालीचे उ ... हा उपक्रम मुकुल माधव फाऊंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू प्रकाश छाब्रिया आणि फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेडचे एक्झिक्युटिव्ह चेअरमन प्रकाश छाब्रिया यांच्या दूरदृष्टीतून आणि मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे.

या उपक्रमाच्या तिसऱ्या टप्प्यांतर्गत गोळप–दाभिळवाडी आणि कोळंबे–बागवाडी येथील अंगणवाड्यांचे नूतनीकरण पूर्ण केले आहे. या कामामध्ये आवश्यक स्वच्छतागृह दुरुस्ती, पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा, आकर्षक रंगकाम, बालकांना ज्ञानवर्धक माहिती देणाऱ्या बोलक्या भिंती तसेच आवश्यक शैक्षणिक साहित्य आणि मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यामुळे अंगणवाड्यांचा परिसर अधिक स्वच्छ, सुंदर बालमैत्रीपूर्ण झाला आहे.

या लोकार्पण कार्यक्रमास जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाचे शिक्षण विस्तार अधिकारी नरेंद्र गावंड, अंगणवाडी पर्यवेक्षिका सौ. सावंत, फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेडचे प्लांट हेड श्री. नामदेव देशमुख, सागर चिवटे आणि विकास कुरतडकर (सिव्हिल विभाग) उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमास स्थानिक सरपंच, ग्रामपंचायत प्रतिनिधी, अंगणवाडी सेविका, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुकुल माधव फाऊंडेशनच्या विभागाचे शामराव निंबाळकर आणि खरद गोरे कार्यक्रमास उपस्थित होते.

बालकांच्या प्रारंभिक शिक्षणासाठी अधिक दर्जेदार आणि बालस्नेही वातावरण निर्माण करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले जात आहे.

बौद्धिक, शारीरिक विकासाला चालना मिळण्यास मदत

बालकांच्या सर्वांगीण विकासामध्ये सुरुवातीच्या शिक्षणाला विशेष महत्त्व असते. अंगणवाडी ही बालकांच्या शिक्षणाची आणि सामाजिक जडणघडणीची पहिली पायरी आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून जुन्या आणि दुरुस्तीची आवश्यकता असलेल्या अंगणवाड्यांचे नूतनीकरण करून ग्रामीण भागातील बालकांना शिक्षणासाठी अधिक अनुकूल वातावरण उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. आकर्षक बोलक्या भिंती, सुधारित पायाभूत सुविधा आणि शैक्षणिक साहित्यामुळे बालकांच्या बौद्धिक, शारीरिक, सामाजिक आणि भावनिक विकासाला चालना मिळण्यास मदत होणार आहे.